# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१३
## (दि. ०७/०३/२०१३ रोजीची तहकुब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ११/०३/२०१३ रोजी दि. ०७/०३/२०१३ रोजीची तहकुब सभा सुचना क्र. ०६ दि. ०२/०३/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

१. श्री. राजु यशवंत भोईर
२. श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३. श्रीम. अनिता जयवंत पाटील
४. श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
५. श्री. मुन्ना सिंह
६. श्री. प्रमोद जयराम सामंत
७. श्री. राजेश शंकर वेतोसकर
८. श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन
९. श्री. शरद केशव पाटील
१०. डॉ. राजेंद्र जैन
११. श्री. संदिप मोहन पाटील
१२. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी
१३. डॉ. रमेश जैन

**गैरहजर सदस्य –**

१.) श्री. रोहिदास शंकर पाटील
२.) श्रीम. मिरादेवी यादव
३.) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील

**मा. सभापती :-**

नमस्कार, सचिव साहेबांनी तहकुब सभेला सुरुवात करावी.

**राजेश वेतोसकर :-**

मा. सभापती साहेब, अर्थ संकल्पावर चर्चा झाल्यानंतर थोडासा वेळ द्या. आरोग्याच्या विषयावर चर्चा करायची आहे. आज सगळीकडे कामकाज बंद आहे. त्या विषयावर ५-१० मिनिटे थोडीशी चर्चा करु.

**उपसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

मा. अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात लेखाशीर्षनिहाय वाढ/घट करुन सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

(रु. लाखांत)

| तपशिल | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|
| एकूण जमा | २५१.०० | २२३.१६ |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | ८१९.४७ | १४७०.३४ |
| एकूण खर्च | १०७०.४७ | १६९३.५० |

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, ठराव झाला, ठराव मांडला याच्यामध्ये जेव्हा सुरुवातीपासुन बसलो कुठेही अधिका-यांनी पूर्ण स्पष्टीकरण दिले असे कुठे ही दिलेलं नाही आज तुम्ही वृक्षप्राधिकरणाचा ठराव कायम केलेला आहे. पण हा कायम करतेवेळी मी आपणाला पेज वाईज त्यांनी काय केले ती सुधारणा तर माहिती पडली पाहिजे ना.

**मा. सभापती :-**

साहेब, आपण सर्वांनी बसुन चर्चा केली होती.

**शरद पाटील :-**

केली चर्चा समोर बसून पण तेच फिगर आहेत किंवा बदली झाले हे कसं माहित पडेल आम्हाला.

**बर्नड डिमेलो :-**

अकाऊंटंट कडुन घ्याना.

**शरद पाटील :-**

अकाऊंटकडुन घ्या म्हणजे आताच घेणं नंतर घेणार काय ठराव झाल्यानंतर.

**बर्नड डिमेलो :-**

हे बघा बदल तर आपण काहीच केलेली नाही.

**शरद पाटील :-**

तेच पेज वाईज सांगाव ना. आम्ही लिहून घेतो.

**बर्नड डिमेलो :-**

बेलवटे साहेब, तुम्ही काय बदल केले आहे का? जसा ठराव झाला त्याच्यात मग त्यांच्या म्हणण्याप्रमाणे काय फरक असेल तर...

**शरद पाटील :-**

मी काय सांगतो साहेब, तुम्ही पेज वाईज सांगितलं तर आम्ही त्याच्यात करुन घेऊ त्याच्यावर चर्चा कुठे करायची आहे.

**प्रमोद सामंत :-**

काहीच चेंजेस झालेले नाही.

**मा. सभापती :-**

बदल झाला असता तर त्यांनी मला सांगितलं असतं तसं काही केलेलं नाही.

**शरद पाटील :-**

जर आम्हाला सांगितलं त्यात जर काही कुठचाही बदल झाला असेल तर त्याला आमची जबाबदारी नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मी काय म्हणतो की, तुम्ही आणि आपण सर्वांनी मिळून जे आकडेवारी केलेली आहे आता परत काय करावं लागेल की, पर पेज आणि पर विभाग

**शरद पाटील :-**

पर पेज आणि पर विभाग, कुठच्याही अधिका-याला बोलवायचं आहे की, किंवा कोणाला उत्तर द्यायचे आहे त्याचा प्रश्न येत नाही तुम्ही केलेलं इथे चेक करुन बघायचं आहे.

**बर्नड डिमेलो :-**

प्रत्येक पेज करायला लागेल ना ?

**मा. सभापती :-**

परत सुरूवात होणार.

**शरद पाटील :-**

बघा. मला कर शंका आहे जी शंका मी मांडली आहे. बाकी तुम्ही जो ठराव केला आहे तो केला आहे. तुम्ही करून घ्या. मला हरकत नाही हयाच्यात मला जे वाटत ते मी सांगितलेले आहे. जर पुढे हयाच्यात काही बदल असेल तर ती जबाबदारी तुमची आहे आमची नाही.

**शरद बेलवटे :-**

पूर्वी जी १५ कोटी २३ लक्ष सबसिडी द्यायची होती ती १४ कोटी ७० लाखावर आलेली आहे.

**शरद पाटील :-**

तुम्ही टोटल सांगितल मी पेज वाईज बोललो .मला हरकत नाही. तुम्ही काही बदल केले असेल ना. तर त्याला आमचा आक्षेप नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, आपले मा. शरद पाटील साहेब त्यांची शंका आहे. मला तरी वाटते त्यांनी कॅल्क्यूलेशन करावे. अकाऊन्ट करून घ्यावे. तस जर तुमच्या निदर्शनास आल तर सांगा की, आम्ही हे केल होत तर तुम्ही अस का केल.

**शरद पाटील :-**

मी सांगितल की पेज वाईज करा. नसेल करायच तर माझ काय ऑब्जेक्शन नाही. पण उदया त्यांच्यात बदली असेल तर मग नंतर आमची जबाबदारी नाही.

**बर्नड डिमेलो :-**

सुचना आहे ना मग सर्वानुमते मंजुर करा ना.

**शरद पाटील :-**

नाही. त्याच्यात जर बदल असेल तर आमच ऑब्जेक्शन आहे.

**बर्नड डिमेलो :-**

बदल आहे तर तुम्ही बघायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

आम्हाला सांगितल्याशिवाय कस माहित पडेल.

**बर्नड डिमेलो :-**

आपण लिहिले आहेत.

**शरद पाटील :-**

त्यांनी फायनल केलेल आहे ना.

**बर्नड डिमेलो :-**

पाटील साहेब, प्रत्येक पेजवर आपण लिहून घेतलेल आहे. तुम्हाला तस फिगरमध्ये जर वेगळा आकडा आला तर तस ऑब्जेक्शन घेवू शकतात.

**शरद पाटील :-**

म्हणुन सांगितले ना. ते माहित पडल्याशिवाय कस ऑब्जेक्शन घेणार. त्यांच्याजवळ त्यांच पडलेल आहे माझ्याजवळ माझ पडलेल आहे.

**मा. सभापती :-**

अधिकारी आपल्याला न विचारता करू शकतील का ?

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझ काय म्हणन आहे की, केल असेल तर, नसेल केल तर नो डाऊट ना. मग तिथे प्रश्नच येत नाही.

**राजेश वेतोस्कर :-**

आपल्या शिवाय ते चेंज कसे करू शकणार.

**शरद पाटील :-**

अस बोलून कसे चालेल. तुम्हाला कशाला भिती वाटायला पाहिले असेल तसे तर ठिक आहे ना. तुम्हाला वाटत नाही का तस ?

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र ४७ :-**

वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४३ :-**

मा. अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात लेखाशीर्षनिहाय वाढ/घट करुन सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|
| एकूण जमा | २५१.०० | २२३.१६ |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | ८१९.४७ | १४७०.३४ |

| | | |
|---|---|---|
| एकूण खर्च | १०७०.४७ | १६९३.५० |

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठरा सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**उपसचिव :-**

प्रकरण क्र. ४८, शिक्षण मंडळ समितीने मंजुर केलेले सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

मा. अध्यक्ष, शिक्षण मंडळ समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात वाढ/घट करुन रक्कम रु. ७८२.२२ लाख 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण करण्यास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

**(रु. लाखांत)**

| तपशिल | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|
| एकूण जमा | ५००.०० | १२९४.५६ |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | ६४६.६० | ७८२.२२ |
| एकूण खर्च | ११४६.६० | २०७६.७८ |

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

माझी या ठरावाला सुध्दा कायम सुचना आहे. आणि त्या सुचने सकट तसे असेल तर त्याची आम्हाला काही हरकत नाही.

**मा. सभापती :-**

ठराव सवानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**राजेंद्र जैन :-**

मंजूर है। लेकिन आपने स्कॉलर शिप का बात किया वह किस लेवल पे लेंगे उसका कुछ प्रोव्हिजन मालुम नही पण अभितक फायनल क्या किया ?

**मा. सभापती :-**

नही किया ।

**प्रमोद सामंत :-**

डॉ. साहेब बक्षिस का एक हेड है इसमे अपुन बच्चे को कन्सीडर करेंगे। लेकिन यह नया हेड नही क्रियेट करते है ।

**प्रकरण क्र ४८ :-**

शिक्षण मंडळ समितीने मंजुर केलेले सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४४ :-**

मा. अध्यक्ष, शिक्षण मंडळ समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात वाढ/घट करुन रक्कम रु. ७८२.२२ लाख 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण करण्यास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

**(रु. लाखांत)**

| तपशिल | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| एकूण जमा | ५००.०० | १२९४.५६ |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | ६४६.६० | ७८२.२२ |
| एकूण खर्च | ११४६.६० | २०७६.७८ |

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठरा सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**उपसचिव :-**

प्रकरण क्र. ४९, परिवहन सेवेचे सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**बर्नड डिमेला :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून २०१३-१४ च्या रु. १८.७४ लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

**(रु. लाखांत)**

| तपशिल | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|
| **एकूण जमा** | १०६५.०२ | ६२६.६४ |
| **एकूण खर्च** | १०४१.५० | ६०७.९० |
| **शिल्लक** | २३.५२ | १८.७४ |

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, परत माझ तेच म्हणणे आहे. तीच माझी सुचना आहे. सुचना नोंद करायची. कुठचाही बदल असेल, कुठेही काही केल असेल त्याची जबाबदारी आमची राहणार नाही. बाकी सर्व ठिक आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**राजेंद्र जैन :-**

एक सुचना लिजिए। उस समय चर्चा के अंदर दिपक सावंत साहबने प्रॉमिस किया था की, यहा यह यह सब है। उसका लिखीत अभितक मिला नाही है। जैसे लोक हे करके बोले या यह होना चाहिए.। या रिप्लेस कर लेंगे। जो-जो वादे किए है। जो हमको समझाया गया। जिसके हम आगे बढे है उसका हमे लेखी स्वरूप में मिलना चाहिऐ।

**प्रकरण क्र. ४९ :-**

परिवहन सेवेचे सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला खर्च विचारात घेवून २०१३-१४ च्या रु. १८.७४ लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते

मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

**(रु. लाखांत)**

| तपशिल | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|
| एकूण जमा | १०६५.०२ | ६२६.६४ |
| एकूण खर्च | १०४१.५० | ६०७.९० |
| शिल्लक | २३.५२ | १८.७४ |

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठरा सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**उपसचिव :-**

प्रकरण क्र. ५०, सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ ''अ'' + ''क'' + ''अग्निशमन'' + ''अंध व अपंग'' + ''महिला व बालकल्याण'' + ''JNNURM'' + ''P'' अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि सुधारित अंदाजपत्रकातील वाढ/घट त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात रक्कम **रु. १८.२५** लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत

**(रु. लाखांत)**

| तपशिल | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|
| अंदाजपत्रक 'अ' + 'क' + 'अग्निशमन' + 'महिला बालकल्याण' + 'अंध व अपंग कल्याण' + 'JNNURM' + 'P' एकूण जमा | ७७७२२.६९ | १०९५०१.०४ |
| अंदाजपत्रक 'अ' + 'क' + 'अग्निशमन' + 'महिला बालकल्याण' + 'अंध व अपंग कल्याण' + 'JNNURM' + 'P' एकूण खर्च | ६९४४७.८५ | १०९४८२.७९ |
| अखेरची शिल्लक | ८२७४.८४ | १८.२५ |

**संदिप पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपली सुचना कायम आहे जे आम्ही केल आहे त्याच्यात कुठचाही बदल नसेल त्या ठरावाला आमची पूर्ण मंजूरी आहे. पण कुठेही बदल केला असेल तर त्याला आम्ही जबाबदार नाही. आणि डॉ. साहेबांनी जी सुचना मांडली ज्या कामाबद्दल त्रृटया होत्या त्या त्रृटी बद्दल कुठचाही खुलासा केला नाही. त्याचे सुध्दा आम्ही जबाबदार राहणार नाही. हे आपण अधिका-यांना सांगितलेल आहे आणि त्यांनी तें दयायला पाहिजे आणि पाणपट्टे साहेबांनी सुध्दा आरोग्यामध्ये मागितल होत. आणि सांगितलेल की गड्डा आहे तो गड्डा देणार आणि तो अजून पर्यत आलेला नाही, ही माझी सुचना लक्षात ठेवा आणि तस काही असेल तर त्याला आम्ही जबाबदार राहणार नाही. आम्ही केलेल्या चर्चेमध्ये जे आहे ते योग्य आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय,इस मेन बजेट के अंदर ३-४ बात है जिनका खुलासा करने का है। नं. १ भारतीय जनता पार्टी का नगरसेवको का मानधन, लॅपटॉप देने का विरोध है। और भ्रमणध्वनी देने का विरोध है। यह तिन चिजो के लिए मेरा विरोध है ।

**मा. सभापती :-**

अपुन ने लॅपटॉप का उल्लेख किया नही है। प्राविधान किया है सभी नगरसेवको के लिए।

**राजेंद्र जैन :-**

हमारा विरोध है। उसके बाद में एक चिज और है की, जिसपर डिसकशन कर रहे थे जैसे परिवहन ने बोला ना लेखी देंगे साहब से बात हुई आरोग्य के अंदर सब कार्यक्रम की सुचना नगरसेवको को दें्गे । उसका थोडा ध्यान रखिए।

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, मला विषय मांडायचा आहे. भारतीय जनता पार्टी प्रत्येक विषयामये विरोध दर्शवितात त्यांचं ते कामच आहे. त्यांनी तो करत रहावे. त्यांचा विरोधी पक्ष हा विरोध करतच रहावं अशी त्यांची ठाम भुमिका आहे. आपण लॅपटॉप च्या बाबतीत असा प्रश्न काढला. पण अन्य नगरपालिकांनी मंजुरी दिली नाही. प्राविधान केलेली आहे. तरतुद केलेली आहे तरतुद करण्याचा हेतु एकच आहे की, महापालिकेला येणारा खर्च वर्षामध्ये पेपरसाठी जो खर्च होतात तो मला वाटते की, लॅपटॉप च्या बाहेर जातो, तर मी सर्वांना जरी माहित पडलं तरी ते सर्वांना पटण्यासारखं आहे आज कागदाचे गठ्ठे पकडण्यासाठी सोबत असीस्टंट ठेवायला लागतो. एवढं मोठं बजेटचं पुस्तकांचं गठ्ठे असतात तर कागदाचा वापर कमी व्हावा आणि लॅपटॉपचं आता आपण आधुनिक तंत्रावर आहोत. २१व्या शतकामध्ये आहोत तर त्याच्यामध्ये लॅपटॉप घेणं हा जनतेच्या पैशाचा दुराचार किंवा गलत वापर करतो असं नसुन तो जनतेचा लाभ व्हावा त्या कागदपत्रापासून मुक्त व्हावे आणि आपण असे सुसज्ज नगरसेवक आपल्या प्रत्येक विभागामध्ये इंटरनेटद्वारे कुठे कोणतं टेंडर जाते कोण कोण टेंडर पास करत सगळी माहिती घर बसल्या प्रत्येक सभासदाला माहिती असावी. या अनुषंगाने लॅपटॉप आणि टॅबलेट चा प्रस्ताव मांडलेला होता जर विरोध असेल तर शासनाची मान्यता घ्यावी कसे काय करता येईल आणि किती खर्च होतो याचा अभ्यास करुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, काँग्रेस पक्ष, आणि इतर आमचे सहकारी पक्ष, अपक्ष यांचा पूर्ण पाठींबा आहे त्यांनी जरी विरोध दर्शविला तरी किती जनतेचा खर्च होतो पैशाचा नाश किती होतो आणि फायदा किती, तोटा किती हा त्यांनी दाखवून द्यावा आणि जनतेसमोर मांडावा.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब आपल्या परवानगीने बोलतो, माझे मित्र राष्ट्रवादीचे गटनेता हे सत्ता पक्षात आहे आणि त्यांना फार ज्ञान आहे आणि बाकी सगळे अज्ञानी आहेत. अशाप्रकारे त्यांचं बोलण आहे त्यांनी आता सांगितलं विरोधी पक्ष आहे, विरोध करणं त्यांचा अधिकार आहे ते सत्य आहे विरोध करण हा आमचा अधिकार आहे पण आम्ही कुठच्याही बजेटमध्ये विरोध केलेला नाही. तुम्हाला ते सांगितलं की जे आम्ही केलं आहे जे त्याच्यात असेल तर आम्हाला ते मंजुर आहे.

**मा. सभापती :-**

साहेब, डॉ. साहेबांनी जो आता विरोध दर्शविला...............

**शरद पाटील :-**

हे बोलणं आहे ते चुकीचं आहे हे खोडतो बोला की प्रत्येक गोष्टीला विराध करतात आम्ही प्रत्येक गोष्टीला विरोध केला नाही. ५ दिवस आम्ही सभेला बसलो त्या सभेत बसताना पूर्ण वेळ बसलो आणि पूर्ण वेळ बसताना जे तुम्हाला मंजुर असेल ते मंजुर केलं आहे प्रत्येक वेळेला आम्ही सांगितलेलं ते तुम्ही खोडलं तरीसुध्दा आम्ही ते मान्य केलेलं आहे आणि आता तुम्ही तेच सांगत असाल की विरोधी आहेत फक्त विरोधच करायचं काम आहे म्हणून विरोध करतो हे चुकीचं आहे. हे बोलण्याचं काही कारण नाही आहे. आम्ही आमच्या पध्दतीने तुम्हाला सांगितलेलं आहे जे आम्ही केले आहे तेच त्याच्यात असेल तर आमची त्याला सहमती आहे आणि नसेल तर त्याला विरोध आहेच आम्ही केलेलं नसेल तर विरोध आहे तुम्ही काय प्रत्येक पेज टाईप आम्हाला वाचून दाखवला नाही ठिक आहे. आम्ही तुमच्या भरोसावर आहोत.

**बर्नड डिमेलो :-**

तुम्ही चुकीचं बोलता मी बजेट या विषयावर बोललो नाही मी लॅपटॉपचं बोलतो मी लॅपटॉप आणि दौऱ्या बद्दलच बोलतो त्याच्याबद्दल मी माझी सफाई दिली तुमचा विरोध असेल तर नोंदवा.

**संदीप पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुमच्या परवानगीने बोलतो, डॉ. साहब उस दीन आपने बोला मेरा विरोध है। अभी एकबार विषय होने के बाद दुबारा विषय नही निकलना चाहीए।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

उसदीन भी बात हुआ आज भी बात हुआ। साहब, भी बोल रहे थे आज भी बात हुआ साहब बोले आप जो बोल रहे है वह सुचना है मै इसलिए बोल रहा हूँ। हमने उसदीन आपसे कहाँ की भ्रमणध्वनी, लॅपटॉप और मानधन बढाने का हमारा भारतीय जनता पार्टी का विरोध है।

गोंधळ

**हेलन गोविंद :-**

मा. सभापती साहेब, आता मा. महासभेमध्ये सर्व नगरसेवकांनी मानधन बद्दल बोलले नाही मग मानधनमध्ये यांचा कुठे विरोध होता. बिजेपी वाल्यांचा कुठे मानधनमध्ये विरोध होता. असं कसं जाऊन जाऊन

मानधनवर का आले? डॉ. साहेब तुम्ही हे चुकीचं बोलता मानधनाचा इथे काय प्रश्न आला मानधन तर महासभेमध्ये मंजुर झालेलं आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मानधन का विषय नही हुआ है। चर्चा नही की है।

**बर्नड डिमेलो :-**

बिजेपी मानधन मत लो गरीबो मे बाट लो।

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. ५० :-**

सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ ''अ'' + ''क'' + ''अग्निशमन'' + ''अंध व अपंग'' + ''महिला व बालकल्याण'' + ''JNNURM'' + ''P'' अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४६ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि सुधारित अंदाजपत्रकातील वाढ/घट त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात रक्कम **रु. १८.२५** लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत

**(रु. लाखांत)**

| **तपशिल** | **२०१२-१३** | **२०१३-१४** |
|---|---|---|
| अंदाजपत्रक 'अ' + 'क' + 'अग्निशमन' + 'महिला बालकल्याण' + 'अंध व अपंग कल्याण' + 'JNNURM' + 'P' एकूण जमा | **७७७२२.६९** | **१०९५०१.०४** |
| अंदाजपत्रक 'अ' + 'क' + 'अग्निशमन' + 'महिला बालकल्याण' + 'अंध व अपंग कल्याण' + 'JNNURM' + 'P' एकूण खर्च | **६९४४७.८५** | **१०९४८२.७९** |
| अखेरची शिल्लक | **८२७४.८४** | **१८.२५** |

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. संदिप पाटील**

**ठरा सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहीर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दुपारी १२.१५ वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**